नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २४७ | Issue - 247 | वार गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ | Blow- Thursday Date 23 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# १५.७० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे ५४ सामंजस्य करार

## दावोसमध्ये इतिहास घडला; महाराष्ट्राचे आजवरचे सर्वाधिक करार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दावोस : दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये इतिहास घडला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने आजच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत १५.७० लाख कोटी गुंतवणुकीच्या एकूण ५४ सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत. यातून १५.९५ लाख रोजगारनिर्मिती होईल.

आजच्या सामंजस्य करारांपैकी सर्वांत मोठ्या गुंतवणुकीचा करार हा रिलायन्स समूहाचा असून, पेट्रोकेमिकल्स, पॉलिस्टर, नवीनीकरणीय ऊर्जा, बायोएनर्जी, हरित हायड्रोजन, ग्रीन केमिकल्स, औद्योगिक क्षेत्रविकास, रिटेल, डेटा सेंटर्स, टेलिकम्युनिकेशन्स, आदरातिथ्य आणि रिअर इस्टेट या क्षेत्रात ते ३,०५,००० कोटी इतकी गुंतवणूक करणार आहेत. या एका करारातून ३ लाख रोजगारनिर्मितीचा अंदाज आहे. रिलायन्स समूहासोबत ३ लाख ५ हजार कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला असून यातील बहुसंख्य गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात होणार असल्याने सुमारे ३ लाख रोजगार निर्मिती यातून होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात नवभारताच्या निर्मितीत योगदान देणारा हा करार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे पहिले राज्य बनवावे, हे स्वप्न आहे. त्यादृष्टीने आम्ही ही गुंतवणूक करणार आहोत, असे रिलायन्स समूहाचे अनंत अंबानी यांनी यावेळी सांगितले.

### रिलायन्स, ॲमेझॉनचे मोठे करार, १५.९५ लाख रोजगारनिर्मिती होणार

दुसरी मोठी गुंतवणूक ही ॲमेझॉन करणार असून, ती ७१,७९५ कोटी रुपये इतकी आहे. एमएमआर क्षेत्रात डेटा सेंटर्सच्या माध्यमातून या गुंतवणुकीतून ८३,१०० इतके रोजगार निर्माण होणार आहेत. गेल्या २ दिवसांत जे सामंजस्य करार झाले, त्यातून राज्याच्या सर्व भागात गुंतवणूक होत असून, समतोल विकासाचा उद्देश यातून साध्य होणार आहे. या एकूण करारांपैकी उद्योग विभागाने ११.७१ कोटींचे करार केले असून, एमएमआरडीएने ३.४४ लाख कोटी तर सिडकोने ५५,२०० कोटींचे करार केले आहेत.

### टोनी ब्लेअर यांची भेट

**दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांची भेट घेतली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान ही भेट झाली. या दोघांमध्ये ऊर्जा आणि सार्वजनिक वाहतूक क्षेत्रासंदर्भात चर्चा झाली. टोनी ब्लेअर यांनी लवकरच भारतात येणार असल्याचा मनोदय यावेळी व्यक्त केला. याशिवाय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्युंडई मोटर्सचे कार्यकारी उपाध्यक्ष बम किम यांची भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीपी वर्ल्डचे अध्यक्ष सुलतान अहमद बिन सुलाएम आणि त्यांचे भारताचे प्रबंध संचालक, सीईओ रिझवान सोमर यांचीही भेट घेतली. महाराष्ट्रात इंडस्ट्रीयल पार्क, लॉजिस्टीक इत्यादी क्षेत्रात सहकार्याबाबत यावेळी चर्चा झाली.**

## थोडक्यात...




### महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागात २२५ पदभरती

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील पदभरतीकरीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

अर्ज सादर करावयाचा कालावधी : दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी १४.०० ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी

# जळगाव रेल्वे दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू!

## आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांच्या ट्रेनमधून उड्या, समोरून येणाऱ्या रेल्वेने उडवले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव : जळगावमध्ये रेल्वेने काही प्रवाशांना उडावल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांनी आग लागल्याची भीतीने ट्रेनमधून खाली उड्या मारल्या. मात्र याच वेळी समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवलं. यामध्ये १२ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर १९ प्रवासी जखमी आहेत.

गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की मृतांपेकी चार जणांचे मृतदेह पाचोरा येथे आहेत. तर आठ मृतदेह हे जळगावला पाठवण्यात आले आहेत. तसेच चार लोक गंभीर जखमी आहेत, त्यांना वृंदावन या खाजगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात जळगाव-मुंबई रेल्वे मार्गावर माहिजी आणि पारधाडे स्थानकादरम्यान ही भीषण दुर्घटना घडली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वे अपघातात एकूण १२ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय चार प्रवासी गंभीर जखमी आणि १६ किरकोळ जखमी आहेत. सर्व जखमींना जळगावसह पाचोरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत आणि जखमी प्रवाशांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

जळगाव रेल्वे अपघातातील मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. तसेच जखमींचा संपूर्ण उपचार मोफत करण्यात येणार आहे.

परधाडे गावाजवळ ही घटना घडली आहे. रेल्वे रुळ ओलांडताना ही दुर्घटना घडल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोकांचे म्हणणे आहे की आग लागल्याच्या अफवेने लोकांनी उड्या मारल्या. १५ ते २० मिनिटात प्रांत अधिकारी आणि कलेक्टर घटनास्थळी पोहचत आहेत. घटनास्थळी पोहचायला जळगावहून ३० ते ४० मिनिटं लागतात. पण जोपर्यंत इथं कोणी जाणार नाही तोपर्यंत हे लक्षात येणार नाही, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी टीव्हा९ शी बोलताना दिली.

या दुर्घटनेबद्दल जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी माहिती देताना सांगितले की, मध्य रेल्वेच्या कंट्रोल रुमकडून माहिती देण्यात आली की, कर्नाटक एक्सप्रेसबरोबर एक अपघाताची घटना घडली, ज्यामध्ये ७ ते ८ लोकांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून आपण तात्काळ रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या. प्रांत अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस अधिकारी देखील पोहचले आहेत. रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील दुर्घटनेनंतर मदतकार्य करत आहेत. ते एबीपी माझाशी बोलताना दिली.

ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय या तीन रुग्णालयाकडून मदत घेतली जात आहे. त्यामध्ये सर्व रुग्णांना मदत केली जात आहे असेही प्रसाद म्हणाले. प्राथमिक माहितीनुसार, ६ ते ८ चा आकडा सांगितला जात आहे. अजून अधिकृत आकडेवारी मिळालेली नाही. सध्या आपली प्राथमिकता जखमींना उपचार देण्याची आहे, असेही आयुष प्रसाद म्हणाले.

# मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत; जखमींवर मोफत उपचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजिकच्या रेल्वे दुर्घटनेतील मृतांप्रति मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंवेदना व्यक्त करून, मृतांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा करून, जखमींवर शासनाच्या वतीने मोफत उपचार केले जावेत असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री श्री. फडणवीस जागतिक अर्थ परिषदेच्या निमित्ताने दावोस दौऱ्यावर आहेत. तेथून त्यांनी या दुर्घटनेची माहिती घेतली.

दुर्घटनास्थळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन पोहचून मदत व बचावासाठी आवश्यक गोष्टींचे व्यवस्थापन करत असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

### मदत व बचाव कार्याचे दावोस येथून मुख्यमंत्र्यांचे समन्वयन

याबाबत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दृकश्राव्य संदेश जारी केला आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचा उल्लेख करून त्यांनी म्हटले आहे की, काही लोकांच्या मृत्यूची ही घटना अतिशय वेदनादायी आहे. जळगांव जिल्हा प्रशासन आणि रेल्वे प्रशासन समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. घटनास्थळी आठ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजिकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात असल्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले आहे.

# हाफकीन जैव औषध निर्माण महामंडळाने औषधांमध्ये नवीन संशोधन करावे : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हाफकीन जैव औषध महामंडळाने अनेक लसींचे संशोधन करून उत्पादन घेतले आहे. हाफकीन ही एक नावाजलेली संस्था आहे. हाफकीनने संशोधीत केलेली सर्पदंशावरील लस सर्वत्र परिचित आहे. महामंडळाने भविष्यातही अशाप्रकारच्या लसी, औषधांमध्ये नवनवीन संशोधन करावे, त्यासाठी शासन नेहमी संस्थेच्या पाठीशी उभी राहील, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी हाफकीन जैव औषध निर्माण महामंडळाला भेट दिली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड, महाव्यवस्थापक (उत्पादन) डॉ. प्रदीप घिवर, व्यवस्थापक (प्रशासन) नवनाथ गर्जे, व्यवस्थापक संपदा पटवर्धन आदी उपस्थित होते.

श्री. आबिटकर म्हणाले, महामंडळाकडील खरेदी कक्ष सार्वजनिक आरोग्य विभागाने आपल्याकडे ठेवावा. औषधांच्या त्यांच्या घटकांनुसार दर्जा तपासण्याची जबाबदारी महामंडळाची आहे. त्यानुसार महामंडळाने औषधांचा दर्जा तपासावा. हाफकीनच्या विकासाची योजना तयार करण्यात यावी. यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे बैठकही आयोजित करण्यात येईल. श्री. आबिटकर यांनी यावेळी सद्यस्थितीत औषध पुरवठ्यासाठी सुरू असलेल्या औषध खरेदीची आणि राज्य शासनाने नेमलेल्या डॉ. माशेलकर समितीनुसार कामकाज सुरू असल्याबाबतची माहिती घेतली.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची मोठी घोषणा

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेचे यश!

# ज्येष्ठ पत्रकारांना मिळणार १ एप्रिलपासून २० हजार रूपये सन्माननिधी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकारांसाठी मोठी आनंदवार्ता आहे. राज्य सरकारने ज्येष्ठ पत्रकारांसाठी मिळणाऱ्या सन्माननिधीत मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच घोषणा केली की, १ एप्रिल २०२५ पासून ज्येष्ठ पत्रकारांना २० हजार रुपये सन्माननिधी दिला जाईल. सध्या हा सन्माननिधी ११ हजार रुपये असून या निर्णयामुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

गेल्या काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संवाद यात्रेचे हे फलित आहे. नागपूर येथून सुरू झालेल्या या संवाद यात्रेची सांगता मंत्रालय, मुंबई येथे झाली. या यात्रेचे आयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंत मुंडे आणि राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

**संवाद यात्रेत सहभागी पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

पत्रकार संवाद यात्रेला महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. यामध्ये दैनिकांचे संपादक, विक्रेते, प्रतिनिधी, वरिष्ठ पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले. मंत्रालयात आयोजित समारोप सोहळ्याला चंद्रकांत पाटील, पंकजा मुंडे, मंगल प्रभात लोढा यांसारख्या मान्यवरांसह सरकारच्या प्रतिनिधींनी हजेरी लावली होती. यावेळी पत्रकार संघाने आपल्या मागण्या सरकारपुढे ठामपणे मांडल्या होत्या.

**सरकारचा सकारात्मक प्रतिसाद**

पत्रकारांच्या मागण्यांवर विचार करून राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली. दोन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय याच संवाद यात्रेच्या निमित्ताने घेतला गेला. त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकारांसाठी मिळणाऱ्या सन्माननिधीत वाढ करण्याचा प्रस्तावही मंजूर झाला.

हा सन्माननिधी वाढीचा निर्णय २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला होता, परंतु त्याची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती. मात्र आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या घोषणेला गती देत १ एप्रिल २०२५ पासून अंमलबजावणी होईल असे ठाम आश्वासन दिले आहे.

### पत्रकारांमध्ये समाधानाचे वातावरण

**राज्य सरकारच्या या निर्णयामुळे ज्येष्ठ पत्रकारांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे या यशात मोठे योगदान असून, हा निर्णय पत्रकारांसाठी अभिमानास्पद आहे.**

**यापुढील काळात पत्रकारांच्या हितासाठी आणखी सकारात्मक पावले उचलण्यात येतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयाने पत्रकारांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय मिळाला असून पत्रकार संघाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे.**

**- विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

## संपादकीय....

### भय इथले संपत नाही

जळगावमध्ये रेल्वेने काही प्रवाशांना उडावल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांनी आग लागल्याची भीतीने ट्रेनमधून खाली उड्या मारल्या. मात्र याच वेळी समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवलं. यामध्ये १२ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर १९ प्रवासी जखमी आहेत. मृतांपेकी चार जणांचे मृतदेह पाचोरा येथे आहेत. तर आठ मृतदेह हे जळगावला पाठवण्यात आले आहेत. तसेच चार लोक गंभीर जखमी आहेत, त्यांना वृंदावन या खाजगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात जळगाव- मुंबई रेल्वे मार्गावर माहिजी आणि पारधाडे स्थानकादरम्यान ही भीषण दुर्घटना घडली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वे अपघातात एकूण १२ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय चार प्रवासी गंभीर जखमी आणि १६ किरकोळ जखमी आहेत. सर्व जखमींना जळगावसह पाचोरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत आणि जखमी प्रवाशांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. जळगाव रेल्वे अपघातातील मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. तसेच जखमींचा संपूर्ण उपचार मोफत करण्यात येणार आहे. परधाडे गावाजवळ ही घटना घडली आहे. रेल्वे रुळ ओलांडताना ही दुर्घटना घडल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोकांचे म्हणणे आहे की आग लागल्याच्या अफवेने लोकांनी उड्या मारल्या. ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय या तीन रुग्णालयाकडून मदत घेतली जात आहे.



## श्री गुरुदत्त शुगर्स वार्षिक २०२५ दिनदर्शिका प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिराळ येथील श्री गुरुदत्त शुगर कारखान्याचा वार्षिक २०२५ दिनदर्शिका प्रकाशन करण्यात आला.

कारखान्याचे सामाजिक कार्य प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोचवण्यासाठी दिनदर्शिका महत्त्वाची ठरत आहे. यावेळी टाकळी केंद्रप्रमुख, शेती मदतनीस, शेतकरी, ऊस वाहतूकदार उपस्थिती होते.

# स्वातंत्र्य लढ्यातील धाडसी नेता : सुभाषचंद्र बोस



महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी सुभाषचंद्र बोस १९२१ मध्ये इंग्लंड वरुन भारतात परत आले. बोस हे जवाहरलाल नेहरु यांचे नेतृत्व असलेल्या गटात गेले. हा गट घटनात्मक सुधारणेसाठी कमी उत्सुक होता आणि समाजवादासाठी अधिक खुला होता. १९३८ मध्ये ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले, १९३९ मध्ये पुन्हा निवडून आले पण पुढे त्यांच्यात आणि महात्मा गांधीमध्ये मतभेद झाले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी गांधींना पाठिंबा दिला. त्यानंतर बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. १९२१ साली इंग्लंडला जाऊन सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले. कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. रविंद्रनाथ ठाकूर ह्यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधीजी मणिभवन नामक वास्तु मध्ये वास्तव्य करत. तेथे २० जूलै १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले. गांधीजींनी देखिल कोलकात्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्यालाआले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी गांधीजींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये हया आंदोलनाचे नेतृत्व करत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले.

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी कोलकाता महापालिकेची निवडणूक स्वराज पक्षाने लढवून जिंकली आणि स्वतः दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली. लवकरच सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरुंसह सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. १९२८ साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते. कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरुं ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरु रिपोर्ट सादर केला.

१९२८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्यात झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरुंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधीजी त्याकाळी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला होता. मात्र सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरु ह्यांना पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देत एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही तर काँग्रेस पूर्ण स्वराज्याची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, त्यामुळे १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झाले, तेव्हा असे ठरवले गेले की २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळला जाईल.

२६ जानेवारी १९३१ च्या दिवशी कोलकात्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरूंगात असताना गांधीजींनी इंग्रज सरकारबरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली. परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगांची फाशी रद्ध करावी ही मागणी गांधीजींनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती की ह्या बाबतीत इंग्रज सरकार जर दाद देत नसेल, तर गांधीजींनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजूने दिलेला शब्द मोडणे गांधीजीना मान्य नव्हते. इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले. भगतसिंगांना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू गांधीजी व काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर फार नाराज झाले. २२ जुलै १९४० रोजी मुंबई येथे सुभाषचंद्र बोसांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशी भेट झाली. दोघांमध्ये देशाचे स्वातंत्र्य आणि देशातील जातीयता व अस्पृश्यता यावर चर्चा झाली.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

भारतीय राष्ट्रवादाचे मुख्य साधन असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने बोस यांच्या देशभक्तीची नेहमीच प्रशंसा केली, परंतु त्यांच्या रणनीती आणि विचारसरणीपासून स्वतःला दूर केले. ब्रिटिशांची राजवट आझाद हिंद सेनेमुळे कधीही धोक्यात आली नाही. ब्रिटिशांनी आझाद हिंद सेनेच्या ३०० अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा आरोप लावला, पण अखेरीस काँग्रेसच्या विरोधामुळे ब्रिटिश मागे सरले. भारतातील अनेकांसाठी ते एक नायक आहेत. पण हुकूमशाही जपान आणि जर्मनीसोबत त्यांचे जाणे, हे टीकेचे एक कारण होते. जर्मनीच्या सर्वात वाईट अतिरेकांवर आणि त्यांच्या अमानुष अत्यांचारावर जाहीरपणे टीका करण्याचे त्यांनी टाळले. तसेच पीडितांना भारतात आश्रय देण्याचीही अनिच्छा दर्शवली. पण हे सर्व जागरूकतेच्या अभावामुळे घडले असेही म्हणता येणार नाही. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते. गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती झाली.

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक अग्रेसर नेते होते. नेताजी असे त्यांना प्रथम १९४२ च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये भारतीय सैनिकांनी आणि बर्लिनमधील भारताच्या विशेष ब्यूरोमधील जर्मन आणि भारतीय अधिकाऱ्यांनी म्हणायला सुरू केले होते. आता संपूर्ण भारतात त्यांना नेताजी म्हटले जाते. एडॉल्फ हिटलरने मे १९४२ च्या उत्तरार्धात बोस यांच्याशी झालेल्या एकमेव भेटीत पाणबुडीची व्यवस्था करण्याची ऑफर दिली. बोस एका जर्मन पाणबुडीवर चढले. त्यांची एका जपानी पाणबुडीत बदली करण्यात आली जिथून ते मे १९४३ मध्ये जपानच्या ताब्यातील सुमात्रा येथे उतरले. जपानच्या पाठिंब्याने बोस यांनी आझाद हिंद सेनेमध्ये सुधारणा केली, ज्यात ब्रिटिश भारतीय सैन्याच्या युद्धातील भारतीय कैद्यांचा समावेश होता. जपान-व्याप्त अंदमान आणि निकोबार बेटांवर भारताचे तात्पुरते सरकार घोषित करण्यात आले आणि जपानने त्याचे प्रमुखपद बोस यांना दिले. जरी बोस असामान्य आणि प्रतिभाशाली होते, तरी जपानी लोक त्यांना लष्करीदृष्ट्या अकुशल मानत होते तसेच त्यांचा सैनिकी प्रयत्न अल्पकाळच टिकला. १९४४ च्या उत्तरार्धात आणि १९४५ च्या सुरुवातीस ब्रिटिश भारतीय सैन्याने भारतावरील जपानी हल्ला परतवून लावला. यामध्ये जवळजवळ अर्धे जपानी सैन्य आणि जपानसोबत सहभागी असलेल्या आझाद हिंद सेनेची तुकडी बळी गेली. यानंतर बोस हे सोव्हिएत युनियनमध्ये भविष्य शोधण्यासाठी मंचुरियाला गेले.

१९२५ साली गोपीनाथ साहा नामक एक क्रांतिकारी कोलकात्याचे पोलीस अधीक्षक चार्लस टेगार्ट ह्यांना मारण्याच्या प्रयत्नांत होता. पण त्याने चुकून अर्नेस्ट डे नामक एका व्यापारी इसमाला मारले. ह्यासाठी त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली. गोपीनाथ फाशी गेल्यावर सुभाषबाबू जाहीरपणे जोरात रडले. त्यांनी गोपीनाथचा पार्थिव देह मागून घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. ह्यावरून इंग्रज सरकारने अर्थ लावला की सुभाषबाबू ज्वलंत क्रांतिकारकांशी संबंध तर ठेवतातच, परंतु तेच ह्या क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान आहेत. ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवताच त्यांना अनिश्चित कालखंडासाठी म्यानमारच्या मंडाले कारागृहात बंदिस्त करून टाकले. ५ नोव्हेंबर १९२५ च्या दिवशी देशबंधू चित्तरंजन दासांचे कोलकाता येथे देहावसान झाले. सुभाषबाबूंनी त्यांच्या मृत्यूची बातमी मंडालेच्या कारागृहात रेडियोवर ऐकली. मंडाले कारागृहातील वास्तव्यात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली, त्यांना क्षयरोगाने ग्रासले. परंतु इंग्रज सरकारने तरीही त्यांची सुटका करण्यास नकार दिला. सरकारने त्यांची सुटका करण्यासाठी अट घातली की त्यांनी औषधोपारासाठी युरोपला जावे. पण औषधोपचारानंतर ते भारतात कधी परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही. त्यामुळे सुभाषबाबूंनी सरकारची अट मानली नाही. अखेर परिस्थिती इतकी कठीण झाली की कदाचित तुरूंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू ओढवेल असे वाटू लागले. इंग्रज सरकारला हा धोकाही पत्कारायचा नव्हता. त्यामुळे सरकारने अखेर त्यांची सुटका केली. मग सुभाषबाबू औषधोपारासाठी डलहौसी येथे जाऊन राहिले. स्वातंत्र्य लढयातील धाडसी नेता सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !



# अमोना येथे खंडोबा यात्रेनिमित्त कबड्डी सामने उत्साहात संपन्न

## मैदानी खेळाच्या माध्यमातून सक्षम युवा पिढी निर्माण होते : गजानन वायाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील अमोना येथे दरवर्षी खंडोबाच्या यात्रेच्या निमित्ताने कबड्डीचे सामने आयोजित करण्यात येत असतात,यावर्षी उद्धाटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते गजानन वायाळ हे होते,उद्धाटन म्हणून बोलत असताना वायाळ पुढे म्हणाले की मैदानी खेळ महाराष्ट्राची संस्कृती आहे.आजच्या कॅम्प्युटरच्या जगामध्ये तरुण पिढी सतत ऑनलाईन व्हॉट्सअँप,फेसबुकवर मग्न झालेली आपल्याला दिसते. मात्र मैदानी खेळ खेळताना कोणी दिसत नाही सोशल मीडियाच्या अतिरिक्त वापरामुळे मुलांना विविध प्रकारचे डोळ्याचे आजार होण्याची शक्यता असते मुलांनी जर मैदानी खेळांना प्राधान्य दिले तर त्यांचा शारीरिक व्यायाम देखील होईल आणि आरोग्य उत्तम राहील.भारताचे भविष्य असलेली युवा पिढी सर्व गुण संपन्न व्हावी पुस्तके ज्ञानाबरोबर युवा पिढी विविध क्रीडा प्रकारात पारंगत असावी खेळामुळे जीवन आनंदी होते आणि कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्याची शक्ती प्राप्त होते असते. ज्ञानाचा आणि खेळाच्या जोरावर युवकांनी स्वतःचे आणि देशाचे नाव उज्वल करावे

मैदानी सांघिक खेळ खेळ असताना विवीध जाती धर्मातील खेळाडू एकत्र खेळतात त्यामूळे एकोपा निर्माण होतो सर्वधर्म समभावाचा विचार रुजवला जातो. परंतु दुर्दैवाने तरूणाई मोबाईल च्या आहारी जाऊन ऑनलाईन खेळांमध्ये वेळ घालवतात.आणि मैदानी खेळ लोप पावत आहेत.परंतु आपण सातत्याने आयोजन करता आपले मनापासून अभिनंदन करतो असे म्हणून गावकऱ्यांचे आभार मानले ह्यावेळी श्रीकृष्ण मिसाळ, अंकुश थूट्टे,अक्षय सुरुषे,प्रल्हाद इंगळे,शिवदास भांदर्गे, रंगनाथ वरपे,गजानन इंगळे,पंचक्रोशितील सर्व प्रतिष्ठित मंडळी सर्व गावकरी मंडळी व अनेक कबड्डी संघाचे खेळाडू उपस्थीत होते.

## लोहा नगरपरिषदेचे घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा,(प्रतिनिधी) : नगरविकास विभाग,विभागीय क्रीडा स्पर्धा छत्रपति संभाजीनगर २०२४-२५ मध्ये लोहा नगर परिषदेने घवघवीत यश संपादन करत सुवर्ण पदक जिंकले.मैदानी खेळ प्रकारात नगर परिषदेचे लिपीक निलेश माधवराव चव्हाण यांनी ४०० मिटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सूवर्ण पदकाचे मानकरी ठरले. तर नंदू दाढेल यांनी कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सूवर्ण पदक जिंकले. त्याबद्दल लोहा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत आण्णासाहेब लाळगे यांनी दोघा सुवर्ण पदक विजेत्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

**बीडमध्ये दर्पण पुरस्काराचे वितरण**

**जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचे प्रतिपादन**

# पत्रकारांनी दोष दाखवताना, नकारात्मक परिणाम होणार नाहीत याची काळजी घ्यावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड/प्रतिनिधी : पत्रकारीता हा समाजाला दिशा देणारा महत्वाचा घटक आहे. अलीकडच्या काळात माध्यमांची व्याप्ती वाढलेली असली तरी मुद्रीत प्रसार माध्यमांचे महत्व कायम आहे. या क्षेत्रात लिखान करणार्या व्यक्तींनी मराठी भाषेचा महिमा वाढवण्याचे काम करावे.तर समाजातील दोष दाखवताना, त्यामधून नकारात्मक परिणाम होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.

बीड येथे२० जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शाखेच्या वतीने दर्पण दिनानिमित्त जिल्ह्यातील ११ पत्रकारांना तसेच एका वृत्तपत्र विक्रेत्यांना यावर्षीचा दर्पण पुरस्कार देण्यात आला.यामध्ये बीड -गंगाधर काळकुटे (सूर्योदय ), परळी -संजय खाकरे (लोकमत),माजलगाव- उमेश मोगरेकर (झुंजार नेता ),वडवणी -जानकीराम उजगरे ( दिव्य मराठी ),धारूर -सय्यद शाकेर (प्रजापत्र ),अंबाजोगाई -अ.र.पटेल (मराठवाडा दर्पण ),आष्टी -अनिरुद्ध धर्माधिकारी (सकाळ ),पाटोदा -संजय सानप (लोकाशा ),शिरूर -अशोक भांडेकर (पार्श्वभूमी ),गेवराई -काझी अमान (लोकप्रभा ),केज -अमोल जाधव (कार्यारंभ ),वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार - अर्जुन बेद्रे यांना जिल्हाधिकार्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला माजी मंत्री बदामराव पंडित, बीड जिल्हा पत्रकार संघाचे संस्थापक संतोष मानूरकर हे उपस्थित होते.या प्रसंगी बोलतांना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पत्रकारीता आणि मराठी भाषा याचे परस्परांशी असलेले नाते उलगडून दाखवले. प्र.के.अत्रेंपासून ते बाळासाहेब ठाकरेंपर्यंत अनेक संपादकांच्या अग्रलेखांनी मराठी भाषेला समृध्द केलेले आहे. मुद्रीत माध्यमांपासून पत्रकारीतेला सुरुवात झालेली आहे. जुन्या काळात व्याकरणाच्या चुका होवू नयेत यासाठी गांभिर्यपुर्वक काळजी घेतली जात असायची. त्यातूनच संपादकांच्या डुलक्या, मुद्रीत राक्षसांचा प्रताप असे विनोदी विषय सुध्दा जन्माला आले. अर्थात मराठी वृत्तपत्र त्या काळी तेव्हढ्याच आत्मीयतेने वाचले जात असायचे. पाक्षीक,साप्ताहिक,मासिक स्वरुपातील माध्यमांनी सुध्दा आपले अस्तित्व निर्माण केले होते. आज माध्यमांचे स्वरुप प्रचंड वेगाने बदलत आहे. तरी सुध्दा मुद्रीत माध्यमांचे महत्व कमी झालेले नाही. येणार्या काळात हे महत्व टिकवून ठेवणे एक आव्हान असेल. त्यासाठी या क्षेत्रात पत्रकारीता करणार्या मंडळींनी अधिकाधिक सज्ज आणि सतर्क राहावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.पुरस्कार प्राप्त पत्रकारांचे जिल्हाधिकार्यांनी विशेष अभिनंदन केले.




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील ग्रामीण पत्रकारीतेचा इतिहास आपल्या भाषणातून मांडला. बीड जिल्ह्यातील पत्रकार हे केवळ बातमीदारीच करत नाहीत तर प्रत्यक्ष कृतीमधून सामाजिक सुधारणा करण्यासाठी आपले योगदान देत आहेत. वर्तमानपत्रांचे विक्रीमुल्य आणि त्या मधून होणारा आर्थिक तोटा ही एक जटिल समस्या असल्याचे ते म्हणाले. अनेक आव्हाने स्विकारुन सुध्दा पत्रकारीता आपल्या पायावर भक्कम उभी आहे.त्यासाठी पत्रकारांसोबतच वृत्तपत्र विक्रेते यांचेही मोठे योगदान असल्याचे मुंडेनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मानूरकर यांनी केले तर सुत्रसंचालन विजयकुमार गिरे यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...



## बनावट सही करून उच्चपदस्थ अधिकाऱ्या विरोधात तक्रार

सोलापूर, (प्रतिनिधी) : मुख्य पोस्ट ऑफिस येथील डॉ.संभाजी मस्के परिवर्तन समता पार्टी व बनावट सही खरी भासवून वनविभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या विरोधामध्ये मंत्रालयात तक्रार करणाऱ्या अज्ञात विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी डॉ.संभाजी सिद्राम मस्के (वय-३७,रा.क्रांतीनगर,घर नंबर ३७ राजीव गांधी नगर भवानी पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १२ नोव्हेंबर रोजी घडली. पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.


# स्वर्गीय संतोष देशमुख व स्वर्गीय सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आरोपींना फाशी देण्याची मागणी : वैष्णवी देशमुख

### पंढरपूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोर्चाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वर्गीय संतोष देशमुख व स्वर्गीय सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वनवा पेटला आहे प्रत्येक जिल्ह्यात दिनांक मोर्चा सुरु आहे आज पंढरपूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात जन आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते.

बीड जिल्ह्यातील मसाजोगि गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी पंढरपुरात जनाक्रोश मोर्चा या सभेच्या आयोजन करण्यात आले होते यावेळी त्यांचे कुटुंब ही उपस्थित होते संतोष देशमुख यांच्या भावाने व संतोष देशमुख यांच्या




कन्येने आरोपीस फाशीची शिक्षा देण्याचे अशी मागणी त्यांनी केली आहे आमच्या



कुटुंबाला न्याय मिळणार नाही अशीही त्यांनी सांगितले.

यावेळी माढा विधानसभेची लोकप्रिय आमदार अभिजीत (आबा) पाटील यांनी देशमुख कुटुंबीयांच्या कायमस्वरूपी आम्ही मागे राहून त्यांना सहकार्य करणार असल्याची जाहीर सभेत सांगितले जोपर्यंत त्यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा होणार नाही तोपर्यंत त्या देशमुख कुटुंबीयांच्या खंबीरपणे मागे उभे राहणार असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी जाहीर सभेत सांगितले.

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (जिमाका) : राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून ,त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.

गुरुवार दि.२३ जानेवारी रोजी सकाळी ९.४५ वाजता शिखर शिंगणापूर येथून नातेपुते ता.माळशिरस जिल्हा सोलापूरकडे मोटारीने प्रयाण, सकाळी १०.१५ वाजता नातेपुते ता.माळशिस येथे आगमण व राखीव, सकाळी १०.३० वाजता नातेपुते येथून मांढवे ता.माळशिसकडे प्रयाण, सकाळी १०.४५ वाजता मांढवे ता.माळशिरस येथे माजी आमदार राम सातपुते यांच्या निवास्थानी सदिच्छा भेट. सकाळी ११.०० वाजता मांढवे येथून माळशिरसकडे प्रयाण. ११.१५ वाजता माळशिरस येथे आगमन व राखीव. सकाळी ११.३० वाजता माळशिरसहून वेळापुरकडे प्रयाण. सकाळी ११.४५ वाजता वेळापूर येथे आगमन व राखीव. दुपारी १२.०० वाजता वेळापूरहून पंढरपूरकडे प्रयाण. दुपारी १२.३० वाजता पंढरपूर येथे आगमन व राखीव. दुपारी १.१५ वाजता पंढरपूर येथून सोलापूरकडे प्रयाण. दुपारी २.१५ वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे आगमन व राखीव. सायंकाळी ६.०० वाजता सोलापूर येथून जिल्हा साताराकडे प्रयाण करतील.

## श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथे विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड

श्री क्षेत्र कानिफनाथ गड बोपगांव ता. पुरंदर जि. पुणे येथे सार्वजनिक बांधकाम ( दक्षिण ) विभाग - पुणे. अंतर्गत गुरुवार दि.२३/१/२०२६ रोजी सकाळी १० वा.विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ.

हस्ते : मा. विजय बापू शिवतारे (माजी मंत्री व विद्यमान आमदार, पुरंदर -हवेली)

मा. दिगंबर दुर्गाडे सर ( अध्यक्ष पी डी सी. बँक पुणे जिल्हा.)

१) बोपगांव कानिफनाथ मंदिर पालखी मार्ग पेविंग ब्लॉक -१० लक्ष.

२ ) मंदिर वाहन-तळ परिसर पेव्हिंग ब्लॉक १० लक्ष.

३ कानिफनाथ मंदिर परिसर सुधारणा करणे १०लक्ष.

४)मंदिर प्रदक्षिणा मार्ग रस्ता सिमेंट रस्ता -१०लक्ष.

५)कानिफनाथ गड मुख्य रोड जिल्हा नियोजन फंडातून १०लक्ष.




अशी माहिती संचालक मंडळ देवस्थान ट्रस्ट यांनी दिली.

- श्री नवनाथ देवस्थान पंचायत, कमिटी ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ बोपगांव.

## राष्ट्रवीर संगोळी रायन्ना राज्याभिषेक वार्षिकोत्सवाची रासपकडून जय्यत तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : रविवार दिनांक २६ जानेवारी रोजी आद्यक्रांतीकारक राष्ट्रवीर संगोळी रायन्ना यांच्या जयंतीनिमित्त नंदगड ता. खानापूर जिल्हा बेळगाव येथील त्यांच्या समाधीस्थळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री राष्ट्रनायक महादेव जानकर यांच्या सहित सहित देशभरातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे उत्तर कर्नाटक प्रभारी सुनिल बंडगर यांनी दिली आहे.




दरवर्षीप्रमाणे नंदगड तालुका खानापूर जिल्हा बेळगाव येथे आद्य स्वातंत्र्यवीर तथा स्वराज्य नायक राष्ट्रवीर संगोळी रायन्ना १७ वा राज्याभिषेक वार्षिकोत्सवचे आयोजन राष्ट्रीय समाज पक्ष राष्ट्रीय कार्यकारणी व कर्नाटक राज्य कार्यकारणी तर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय महादेवजी जानकर माजी मंत्री महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासेफचे राष्ट्रीय अध्यक्ष सिद्धप्पा अक्कीसागर, तर विशेष अतिथी म्हणून बेळगाव जिल्ह्यातील खानापूर विधानसभेचे आमदार विठ्ठल हलगेकर उपस्थित राहणार आहेत. तर सन्माननीय अतिथी म्हणून रासपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शिवलिंप्पा किन्नुर, राष्ट्रीय संघटक गोविंदराम शूरनर, बाळकृष्ण लेंगरे, राष्ट्रीय महासचिव कुमार सुशील, के प्रसन्नाकुमार (केरळ), राष्ट्रीय खजिनदार मोहन माने, राष्ट्रीय सचिव एम.जी माणिशंकर (तमिळनाडू), हेमंत पंड्या (गुजरात), राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य चंद्रपाल (उत्तर प्रदेश), ईशान्य भारत प्रभारी डॉक्टर मनोज निगडकर, गुजरात राज्य प्रभारी सुशील शर्मा, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ शेवते, बिहार राज्य प्रभारी गोपाल पाठक, मध्यप्रदेश प्रभारी प्राणसिंह पाल, मध्यप्रदेश राज्य अध्यक्ष श्रीलाल बघेल, आसाम प्रदेशाध्यक्ष गोपाल कहार, तेलंगणा प्रभारी रमाकांत करगटला, दिल्ली प्रभारी श्रीमती हेमलता पाल, उत्तर प्रदेश प्रभारी श्रीकांत गुरुजी, पश्चिम बंगाल प्रभारी महेश पॉल, मणिपूर संघटक प्रा. जॅक्शन खुमुकचम, तमिळनाडू प्रदेशाध्यक्ष जी लायन राजा, मेघालय युवा प्रदेशाध्यक्ष अर्लो चिगन के संगमा, महाराष्ट्र प्रदेश मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर, मध्य प्रदेश उपाध्यक्ष डी. एस. चव्हाण, मध्य प्रदेश महासचिव रामविलास कीरार, मध्य प्रदेश सचिव मोहरसिंह केवट, राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आघाडी अध्यक्ष नरेश वाल्मिकी, सामाजिक नेते शंकर सोनळी, जे के. रेझा, मुंबई महिला आघाडी अध्यक्ष महक चौधरी, पत्रकार सुरेश दलाल, पत्रकार आप्पाजी पाटील, व अन्य प्रमुख पदाधिकारी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे उत्तर कर्नाटक प्रभारी सुनिल बंडगर यांनी दिली.

## विज कामगार महासंघाची धाराशिव मंडळ नूतन पदाधिकारी कार्यकारिणी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : धाराशिव येथे मंगळवार (दि.२१) रोजी महाराष्ट्र राज्य विज कामगार महासंघाची नूतन पदाधिकारी निवड जाहीर करण्यात आली.

यात धाराशिव मंडळ कार्यकारिणी, विभागीय कार्यकारिणी धाराशिव, तुळजापूर सन २०२५ते २०२७नूतन पदाधिकऱ्यांना मान्य वरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्गदर्शक मा.श्री.गोविंद अयाचित, प्रमुख पाहुणे मा.श्री.उंद्रे बापु, निवडणूक अधिकारी नारायण गडगडे, लातूर परिमंडळ सचिव प्रवीण रत्नपारखी, परिमंडळ अध्यक्ष नवनाथ बडे,यांची उपस्थिती होती. यावेळी मान्य वरांच्या हस्ते विश्व कर्मा प्रतिमेचे पूजन करून प्रवीण रत्नपारखी यांनी श्रमिक गीत घेऊन, अनंतदास मंदिर येथे धाराशिव मंडल अंतर्गत कामगार महासंघाची मंडळ, विभागीय कार्यकारिणी यांचा प्रशासनासोबत परिचय व स्वागत करण्यात आले.व मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले.

या मध्ये धाराशिव मंडळ अध्यक्षपदी शाम आबाचने, उपाध्यक्ष विकास गाडेकर,सचिव निलेश भिरंगे, सहसचिव सातय्या स्वामी, रणजित मोटे, संघटनमंत्री शिवाजी दूधभाते, कोषाध्यक्ष जयकर कोळगे, प्रसिद्धी प्रमुख विनोद कुंभार, तसेच तुळजापूर विभागीय कार्यकारिणी मध्ये अध्यक्षपदी अमोल पाटील, सचिवपदी मोहन गुरव, संघटनमंत्री अनिल कोल्हे, कोषाध्यक्ष आप्पाराव लवटे, प्रसिद्धीप्रमुख महमद लदाफ, धाराशिव विभागीय कार्यकारणीत अध्यक्षपदी दलूचंद बोंदर, सचिव उमाकांत जाधव, संघटन मंत्री विलास अहिरे, कोषाध्यक्ष सुनीता देवकर, प्रसिद्धी प्रमुख डी. बी.पवार या सर्वां नुतन पदाधिकारी यांचे नियुक्ती पत्र व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यानंतर मनोगत व्यक्त केले आयचित यांनी संघटनेचा सुरुवातीच्या काळापासुन ते आजतागायतच्या प्रवासाचा सोबती असुन सुरुवातीचा संघर्ष व आजची महासंघाचा झालेला वटवृक्ष याबाबत अनेक प्रसंगाची आठवण करुन देत या सर्वांसोबत काम करता आल्याचे समाधानही व्यक्त केले. व हेच संस्कार सोबत घेऊन आपण पुढील वाटचाल कराल अशी अपेक्षा व्यक्त केली व पुढील वाटचालीस सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.

तद्नंतर बी.जी.ऊंदरे बापु यांनी पुर्वी काम करताना संपर्काची साधने व महासंघाची पाहीलेली वाटचाल व भविष्यात येऊ घातलेले खाजगीकरणाचे संकट यावर भाष्य केले व ज्या ठीकाणी आपली ताकद कमी आहे, असे वाटतेय तीथे संपर्काच्या माध्यमातुन आपले पाय घट्ट रोवण्याचे आवाहन केले. यावेळी धाराशिव मंडळातील महासंघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

चार लाख रुपयेचा मुद्देमाल जप्त

आरोपींवर गुन्हा दाखल

# पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई; दोन आरोपी गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील देगाव येथील सदर गुन्ह्यात यातील आरोपीही खेड शिवापुर जिल्हा पुणे येथील वीट भट्टी चालक असून फिर्यादींचा मुलगा हा वीट भट्टी वरती कामाला होता त्याने आरोपी कजबे यांच्याकडून पाच ते सहा लाख रुपये उचल घेतली होती आणि काम सोडून निघून आला होता त्यानंतर त्याला आरोपी आणि वारंवार फोन करून कामासाठी व पैशासाठी तगादा लावल्यानंतर त्याने जाण्यास नकार दिला नंतर आरोपी यांनी फिर्यादीस गाडीमध्ये घालून जबरदस्तीने घेऊन जाताना फिर्यादीच्या वडिलांनी पोलीस स्टेशनला माहिती दिल्यानंतर पुढे कोणतेही अप्रिय घटना होऊ नये म्हणून आम्ही तात्काळ स्वतः आरोपींच्या गाडीचा शोध घेऊन रंगाची शिफ्ट कार एम एच १२ डी एस ७०६५



ही गाडी किंमत रुपये चार लाख रुपये चा मुद्देमाल सदर तपासाकामी जप्त केल्या असून आबा उर्फ अभिजीत कसबे राहणार खेड शिवापुर जिल्हा पुणे करंजीत भिडे राहणार धाराशिव दोन आरोपी या दोन आरोपींना गुण्याच्या तपासा कामे अटक केलेल्या असून आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे फिर्यादी रवींद्र ईश्वर वायदंडे यांचा मुलगा रोहित रवींद्र वायदंडे वय २४ वर्ष राहणार देगाव तालुका पंढरपूर यांना यांची आरोपीकडून चार तासात पंढरपूर तालुका पोलीस आणि सुटका केलेली आहे आरोपींना पुणे सोलापूर रोडवर कानामध्ये घेऊन त्यांच्यावर कारवाई करून गुन्हा दाखल करून दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे सदर ही घटना घडल्यानंतर रात्री एक ते सकाळी आठ वाजेपर्यंत पंढरपूर तालुका पोलिसांनी अतिशय तत्परतेने सदरच्या घटनेचा तपास करून आरोपींना अटक केल्या बाबत देगावच्या ग्रामस्थांनी पंढरपूर तालुका पोलीस यांचे कौतुक केले आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री तय्यब मुजावर येथे आहे श्री विश्वास पाटील पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत शिंदे पोलीस कॉन्स्टेबल परशुराम शिंदे पोलीस कॉन्स्टेबल सुजित उबाळे पोलीस कॉन्स्टेबल संतोष चव्हाण पोलीस कॉन्स्टेबल खेडकर यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

## वाघोली येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील वाघोली येथे गेल्या अकरा वर्षापासुन अविरत पणे अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा साजरा केला जातो .प्रतिवर्षाप्रमाने याही वर्षी वाघोली येथील अखंड हरिनाम सप्ताहाला आज सुरुवात झाली असुन, या सप्ताहात श्रीमद भागवत कथेच आयोजन करण्यात आले असुन साधवी आरतीताई शिंदे श्रीरामपुर यांच्या सुश्राव्य वानितुन भाविकांना भागवत कथा ऐकता येणार आहे.

सप्ताहात काकडा, विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन हरीपाठ, व्यासपीठ अधिकारी गोविंद शिंदे सह ह.भ.प मारुती महाराज हरंगुळकर ,ह.भ.प बंडा महाराज अलगरवाडीकर .ह.भ.प व्यकटेश फड महाराज ,ह.भ.प गहनिनाथ महाराज औसेकर, ह.भ.प देविदास महाराज



,ह.भ.प साध्वी आरतीताई शिंदे,ह.भ.प प्रीयंकाताई साखरे ,यांच्या किर्तनाचे आयौजन करण्यात करण्यात आले असुन ह.भ.प भुजन महाराज तळणी मोहगाव याचे शेवटच्या दिवशी काल्याचे किर्तन होणार असुन या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा अस आवाहन सप्ताह कमीटीच्या वतिने करण्यात आले आहे.

यावेळी सरपंच उषाबाई पंडीत पवार, उपसरपंच गोपीचंद पवार, वारकरी साहित्य परीषद औसा तालुकाध्यक्ष ह.भ.प,भागवत शेषेराव गोरे, तंटामुक्ती अध्यक्ष पंढरी पवार ,कीसन दळवे, बालाजी जाधव, विलास पाटील, संजय चिंचोले निळकंट पाटील उत्तम पवार सुरेश काजे मोहन शिंदे, व्यंकट जाधव राजेंद्र पवार गणपतराव पाटील पंढरी जाधव दीलीप पवार, दिलीप जाधव बालाजी पवार, कमलाकर शिंदे, कीसन दळवे बालाजी पवार नागनाथ जाधव, राघवेंद्र जाधव, शामलबाई शिंदे कमलबाई जाधव, पद्मीनबाई जाधव, रशिका गोरे, गयाबाई जाधव, शिवकन्या गुजले, मंडोधरी पवार, वंदना जाधव, फुलाबाई पवारसह वाघोली गावचे ग्रामस्थ.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### कंटेनरची ट्रकला पाठीमागून धडक

सोलापूर, (प्रतिनिधी) : हिप्परगा गावातील गणपती मंदिराजवळ हायवे ब्रिजवर थांबलेल्या ट्रकला पाठीमागून आलेल्या कंटेनरने धडक दिल्याची घटना २० जानेवारी रोजी रात्री साडेनऊ वाजता घडली.याप्रकरणी सोमशेखर लिंगप्पा अक्कलकोटे (वय-३९,रा.उत्तर कसबा,बाळीवेस) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून एम.एच.१२.एल.टी.४२५३ या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,फिर्यादीच्या व्ही आर एल रोड लाईन कंपनीचे कंटेनर (क्रमांक के.ए ६३.६०३४) यावरील चालक मल्लिकार्जुन शंकऱ्याप्पा मंगलोर हा दिल्लीतून सोलापूर मार्गे धावनगिरीकडे जात होते. वरील ठिकाणी टाटा कंपनीचा माल ट्रक क्रमांक (एम.एच.१२.एल टी.४२५३) या चालकाने गाडी रस्त्याच्या मधोमध कोणत्याही प्रकारची पार्किंग लाईट किंवा रिप्लेक्टर न लावता लावली.तसेच अपघात होऊ नये याची कोणतेही खबरदारी न घेता बेजबाबदारपणे उभी केल्याने फिर्यादीच्या व्ही आर एल रोडलाईन कंपनीचे कंटेनर क्रमांक के.ए.६३ ६०३४ वरील चालकास सदरचा ट्रक दिसला नसल्याने त्यास मागून धडक दिल्याने जखमी होऊन बेशुद्ध पडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# मुंबईकरांचे आधारवड, शताब्दी टॉवर उभे करण्याचे एकनाथ शिंदे यांचे निर्देश

## सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या ९९ वा वर्धापन दिन सोहळा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : केईएममध्ये येणाऱ्या रुग्णांना जागा कमी पडू नये यासाठी रुग्णालयात आयुष्मान शताब्दी टॉवर उभे करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवार,२२ जानेवारी रोजी दिले. केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात ते बोलत होते. सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या ९९ वा वर्धापन दिन सोहळा रुग्णालयाच्या प्रांगणात पार पडला.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार कालिदास कोळंबकर, सुनील शिंदे, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त विपिन शर्मा, केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत उपस्थित होते.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, केईएम रुग्णालय हे रुग्णसेवेचे अखंड व्रत घेतलेले मुंबईकरांचे खऱ्या अर्थाने आधारवड आहे. केईएमने घेतलेले रुग्णसेवेचे व्रत अवघड आहे. आजही इथली रुग्णसेवा अहोरात्र चालू आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. ते आहेत म्हणून सामान्य मुंबईकर आज जगतो आहे. घरातल्या आधारवडासारख्या बुजुर्ग व्यक्तीबद्दल आपल्याला आदरभाव असतो, आपुलकी असते. तशीच भावना केईएमबद्दल आहे. आज केईएम रुग्णालय हे देशातील सर्वोत्तम रुग्णालयांपैकी एक आहे. केईएम हे कुटुंब आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते. आरोग्य क्षेत्राच्या नव्या दिशा आणि आंतरराष्ट्रीय मानके केईएमने स्थापित केली आहेत, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, केईएम सारखी रुग्णालये ही सर्वसमान्यांसाठी देवदूतासारखी आहेत. या रुग्णालयात झिरो प्रिस्किप्शन पॉलिसी लागू करावी. केईएममध्ये येणाऱ्या रुग्णांना जागा कमी पडू नये यासाठी शताब्दी महोत्सवी वर्षात आयुष्मान टॉवर उभे करावे. तसेच रुग्णाच्या नातेवाईकांची परवड होवू नये यासाठी व्यवस्था निर्माण करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. याठिकाणी डॉक्टरांचे म्युझियम करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# नळदुर्ग येथील शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थी अनेक सुविधा पासून वंचित

## सदरील प्रकरणी चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची रिपाइं (आठवले) ची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ ए. के . गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह (मुलांचे)नळदुर्ग ता. तुळजापूर येथील आधिकारी व कर्मचारी यांच्या मनमानी कारभारामुळे येथील विद्यार्थी त्रस्त झाले असून अनेक सुविधा पासून वंचित आहेत. तरी वरिष्ठाधिकारी यानी चौकशी करून सदर प्रकरणी योग्य ती कारवाई करावी असी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवने) शहर शाखेच्या वतीने धाराशिव जिल्हाधिकारी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे

या बाबत माहीती असी की शासनाने ग्रामीण भागातील गरीब मागासवर्गीय विद्यार्थाना शिक्षणा बरोबरच राहण्याची भोजनाची सोय व्हावी शिक्षणासाठी लागणारे शैक्षणीक साहित्य त्याना मिळले पाहिजे एकंदरीत मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणा पासून वंचीत राहू नये या उदात हेतूने महाराष्ट्र शासनाने नळदुर्ग ता.तुळजापूर या ठिकाणी सर्व सुविधानिशी शासकीय वसतीगृह सुरू केले असून या वसतीगृहा मध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी राहतात.परंतू या वसतीगृहातील शासकीय कर्मचारी व अधिकरी यांचा येथे मनमानी कारभार चालतो असे समजते. विद्यार्थ्यांना मिळाणाऱ्या मुलभूत सुविधा पुरविल्या जात नाहीत. विद्यार्थ्याना अभ्यासायाठी दिलेले फलक किंवा अन्य शैक्षणीक साहित्य दिले जात नाही, विद्यार्थाना क्रीडा साहीत्य पुरविले जात नाही. विद्यार्थ्यासाठी देण्यात येणाऱ्या भोजना मध्ये कूचराई केली जाते, ज्या दिवसी मांसाहारी जेवन असेल त्या दिवसी असशाकीय कर्मचाऱ्याना शामिल करणे बाहेर डबे देणे, असा प्रकार चालतो. स्वयपाक खोलीतील सी सी टिव्ही कॅमेरा जाणीव पूर्वक बंद ठेवण्यात आला आहे.शासनाने दिलेले साहित्य बंद खोलीत टाळा मारून ठेवण्यातआलेआहे.तसेच वसतीगृहाच्या काही खोल्याच्या खिडकीच्या काचा तुटलेल्या आहेत याकडे कर्मचारी दुर्लक्ष करतात,काही कारणास्तव वसतीगृहातील विद्यार्थी एखादया दिवसी गैहजरअसेल किंवा गैरसोयी बाबात विचारणा केली तर त्याला वसतीगृहातून काढून टाण्याची धमकी दिली जाते. एकंदरीत येथील कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे

येथिल विद्यार्थी त्रस्त झाले असून त्याना तोंड दाबून बुक्कीचा मार सहन करावा लागत आहे.

तरी जिल्हधिकारी साहेबानी वेळीच लक्ष देवून येथील विद्यार्थ्यांची गैरसोय दुर करावी असी मागणी रिपाइं (जर्षीशप) नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने करण्यात येत असून रिपाइंच्याध धाराशिवजि जिल्हाकारी याना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं (आठवले) चे शहराध्यक्ष मारुती खारवे, रिपाइंचे जिल्ह समन्वयक अरुण लोखंड यांच्या सह्या आहेत.

# टेनिस क्रिकेट स्पर्धेत के.सी.सी.बॉईज बेलघर अव्वलस्थानी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केतन भोज : तळा तालुका क्रिकेट असोसिएशन यांचा गुणगौरव सोहळा सन २०२३-२४ दादर श्री शिवाजी मंदिर येथे रविवारदि.१९ जानेवारी रोजी पार पडला.या गुणगौरव सोहळ्यात (मागील वर्षी सन २०२२/२३ दुसऱ्या क्रमांकावर विराजमान) के.सी.सी.बॉईज बेलघर संघ तळा तालुक्यातील अधिकृत नोंदणीनुसार एकूण ९४ संघांमध्ये टेनिस क्रिकेट स्पर्धेमधील अव्वल स्थानी उत्तुंग कामगिरी करणारा पहिला क्रमांक व शिस्तबध्द संघ असे एकाच वेळी दोन पारितोषिक पटकणारा संघ ठरला असून के.सी.सी.बॉईज बेलघर संघाचे खेळाडू प्रकाश गोळे, प्रणव कदम,यश आंबार्ले हे तळा तालुका क्रिकेट असोसिएशनच्या संघातून खेळण्यास पात्र ठरले असून सर्वोत्कृष्ट फलंदाज दिनेश खुटिकर, सर्वोत्कृष्ट गोलंदाज प्रयाग पाशिलकर, सर्वोत्तम ऑल राऊंडर भावेश कुऱ्हाडे यांची निवड करण्यात आली.तसेच एकूण ९४ अधिकृत नोंदणी संघातून प्रथम क्रमांक के.सी.सी बॉईज संघ बेलघर, द्वितीय क्रमांक यंग बॉईज संघ रहाटाड (कोळीवाडा), तृतीय क्रमांक काळभैरव क्रिकेट संघ अडनाले, चतुर्थ क्रमांक नवहिंद क्रिकेट संघ पाचघर,पाचवा क्रमांक एम एस सी क्रिकेट संघ मांदाड हे पारितोषिक पटकाविण्यात एक ते पाच क्रमांकाचे मानकरी ठरले. या कार्यक्रम निमित्ताने तळा तालुका क्रिकेट असोसिएशन चे सर्व पदाधिकारी, तळा तालुक्यातील राजकीय, सामाजिक संघटनेतील पदाधिकारी, बेलघर/तळघर ग्रामस्थ, तळा तालुक्यातील बहुतांश क्रिकेट खेळाडू यांच्या व्यतिरिक्त अन्य मान्यवर मंडळी उपस्थित होते.तळा तालुका क्रिकेट असोसिएशन संघटना ही सामाजिक बांधिलकी जपत सर्व धर्म समभाव अश्या प्रेरणेने विविध प्रकारे कार्यक्रम राबवित असते त्यातून हा एक क्रिकेट माध्यमातून गुण गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.




# चांदोरी येथे शेतकरी कार्ड शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील चांदोरी येथे नुकतेच शेतकरी कार्ड शिबीराचे आयोजन करण्यात आले. असून शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सहजगत्या मिळावा, यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शिबीरामध्ये अनेक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या हस्ते करण्यात आले.असुन यावेळी मंडळ अधिकारी, चांदोरी जयंत लिलके, ग्राम महसूल अधिकारी, चांदोरी सत्यम चौधरी आणि विनायक खरात, सरपंच चांदोरी ग्रामपंचायत, सेतु संचालक शेखर जाधव, चांदोरी इतर सदस्य तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी या शिबीरात सहभागी झाले होते.

शिबीरात शेतकरी क्रेडिट कार्ड (घउउ) संदर्भातील सर्व माहिती पुरविण्यात आली. शिवाय पीएम किसान योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, मृद व जलसंधारण योजना आणि खत व बियाणे अनुदान यांसारख्या विविध योजनांचा लाभ घेण्याच्या पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, कृषी साधने व तंत्रज्ञानाच्या वापराविषयीही शेतकऱ्यांना माहिती देण्यात

### शेतकऱ्यांना मिळणार शासनाच्या विविध योजनांचा लाभ

आली.

यावेळीउपस्थितशेतकऱ्यांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याचे निराकरण करण्यात आले. अनेक शेतकऱ्यांनी शिबीराचा लाभ घेत आपापल्या नावावर शेतकरी कार्डाची प्रक्रिया पूर्ण केली. काही शेतकऱ्यांना तत्काळ लाभ देण्यात आला.

कार्यक्रमात ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेखर जाधव, सेतुसंचालक, चांदोरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार वाल्मिक गडाख यांनी मानले.

असे उपक्रम शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी महत्त्वाचे ठरत असून शासनाने यापुढेही अशा शिबिरांचे आयोजन करावे, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.

**मतदानचं चोरून घेतलं तर भ्रष्टाचार काय आहे : बच्चु कडू**

**पिक विम्यासाठी १ रुपया का घेता : बच्चु कडू**

# केंद्रात सरकार वाचवणे हे उध्दव ठाकरे व शरद पवार यांच्याच हातात : बच्चु कडू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर विश्रामगृह येथे प्रहार संघटनेचे संस्थापक तथा दिव्यांग मंत्रालयाचे विद्यमान अध्यक्ष बच्चु कडू यांची प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली. यावेळी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकित प्रहार सोलापूर जिल्हात आपले उमेदवार उभा करणार

### भविष्यात अजित पवार व एकनाथ शिंदे यांना सत्तेतुन बाहेर काढण्याचा भाजपचा डाव : बच्चु कडू

तसेच महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणुन संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून ज्या विठ्ठलाची ओळख गोरगरीब, कष्टकरी यांचा देव म्हणून आहे. त्या पंढरीच्या पावन नगरीतुन सुरुवात करणार असल्याचे यावेळी बच्चु कडू यांनी व्यक्त केले. तर भविष्यात प्रहार संघटनेची ओळख पांडूरंगाच्या पंढरीतून संपूर्ण महाराष्ट्राला झाली पाहिजे. येणार्या सर्वच निवडूकि मध्ये प्रहार जनशक्ती पक्ष आपली ताकत दाखवेल. पंढरपूर शहर व तालुक्यात गावं तिथं शाखा, गांव तिथं प्रहार हा उपक्रम जोरात राबवून गोरगरीब, दिव्यांग, विधवा, निराधार, कामगार यांना न्याय देण्यासाठी आंदोलन करून गुन्हे दाखल झाले तरी चालतील असे परखड मत व्यक्त केले.





यावेळी ता. प्रमुख संतोष मोरे यांनी बच्चुभाऊ कडू यांचे आदेशाने व जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ मस्के व उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाने संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले.

सर्व सामान्य माणसाला शासकिय कार्यालयात न्याय मिळत नसेल तर अधिकार्याना चोप देऊन साडे तीनसे गुन्हे अंगावर घेणारा बच्चु बच्चु कडू आहे. प्रहारच्या पदाधिकार्यांनी सुद्धा फक्त पद घेऊन बसण्या पेक्षा जर सर्व सामान्य जनतेला एखाद्या कार्यालयात वारंवार हेलपाटे घालवे लागत असतील तर आंदोलन करून अधिकार्याना चोप देऊन गुन्हे अंगावर घेतले तरी काय हरकत आहे असे मत बच्चु कडू यांनी पंढरीत व्यक्त केले.